# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.७३५६/२०२६

श्री .चंद्रशेखर एस. रावराणे,
2/304 लक्ष्मीनारायण नगर,
एकसर तलाव, बोरीवली (प),मुंबई-400 103.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय (बोरीवली विभाग),
बोरीवली पोलीस स्टेशन इमारत, बोरीवली रेल्वे स्टेशनच्या समोर,
स्वामी विवेकानंद रोड (S.V. Road),
बोरीवली पश्चिम, मुंबई-400092.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-11,
बोरीवली पोलीस स्टेशन इमारत,
बोरीवली रेल्वे स्टेशनच्या समोर,
स्वामी विवेकानंद रोड (S.V. Road),
बोरीवली पश्चिम, मुंबई- 400092.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०९.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०४.२०२३ | २७.०५.२०२३ | - | १०.०७.२०२३ |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक १७/०४/२०२३ रोजीच्या जोडपत्रानुसार साई सुमन गृहनिर्माण सहकारी संस्था येथील पुर्नविकास संदर्भात एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे येथे दिनांक ०९/०४/२०२३ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जाची प्रत मागितली असून सदर अर्जाची चौकशी चालू असल्याने **कलम ८ (ज)** अन्वये माहिती देता येत नसल्याचा प्रतिसाद तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक २७/०५/२०२३ रोजी दिला असून त्याविरुद्ध अपिलार्थीनी प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर प्रस्तुत प्रथम अपील अर्जावर दिनांक ०४/०७/२०२३ रोजी सुनावणी देखील आयोजित करण्यात आली होती. तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ-११ यांनी चौकशी प्रलंबित असल्याने **कलम ८ (१) (ज)** अन्वये माहिती

नाकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य असल्याचे निर्देशित करीत अपिल अर्ज खारीज केलेला आहे. त्याविरुद्ध प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून प्रस्तुत प्रकरण हे कालबाह्य झाले असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता तथापि, उपरोक्त तक्रार जर कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असल्यास अपिलार्थीना अद्यापही ती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य असल्यास **कलम २ (च)** प्रमाणे उपरोक्त तक्रारीची एक प्रत अपिलार्थीना विनामूल्य देण्याच्या निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र. ७३५६/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**
**दिनांक : २१.०९.२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

RAHUL BHALCHANDRA PANDE

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA PANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:Maharashtra State Chief Information Commission Mumbai, o=Maharashtra State Chief Information Commission Mumbai, ou=State Information Commission, 2.5.4.20=211FC8BA99B710538561CE022F16DB877507502E9F09443B2466F775AF4FDB2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1CEAB2634AF0275602A939C8218A713079109F9B806F4EF6C4B02C512873C5C2, cn=RAHUL BHALCHANDRA PANDE
Date: 2026.10.19 12:20:51 +05'30'